**विशेष दिवाणी दावा क्रमांक – ४२/२०१८**
**नि.क्र. १५ /क सोबत**

**उलटतपास शपथेवर पुन्हा सुरु**

१४. प्रतिवादीची व माझी सन २०१५ मध्ये ओळख झाली. हे म्हणणे खरे आहे की, त्यानंतर आमचे व्यावसायीक संबंध आले. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी व माझी पूर्वी काही ओळख नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, सन २०१५ पूर्वी आमच्यात कोणताही आर्थिक व्यवहार झालेला नाही. प्रतिवादी व वादी यांच्यामध्ये एक दलाल असतो व दलालामार्फत वादीला ऑर्डर जाते. पार्टीचे नांव दलाल सांगतो त्यामुळे ती ऑर्डर नेमकी कोणाची आहे ते दलालामार्फत मला कळते. हे म्हणणे खरे आहे की, दलालाने एखाद्या पार्टीची ऑर्डर दिले नंतर ती ऑर्डर त्याच पार्टीची आहे हे केवळ दलाला मार्फत माहिती होते. हे म्हणणे खरे आहे की, संबंधित पार्टीने देखील मागणी केलेली नसते. राजु रामचंद्र हावळ हा आमचेत एकच दलाल होता. दलालामार्फत आलेली ऑर्डर आम्ही तोंडी घेत असतो.

१५. आमच्याकडे आलेल्या ऑर्डरचा आमचे गोडाऊनचा गेट पास दलालामार्फत पार्टीला दिला जातो. हे म्हणणे खरे आहे की, ज्याच्याकडे गेट पास आहे त्या व्यक्तीस गोडाऊन मधुन माल दिला जातो. हे म्हणणे खरे नाही की, गोडाऊन मध्ये माल नेमका कोण घेते याची खातरजमा नसते. आमच्या कडच्या नोंदीमध्ये वाहन क्रमांक, ड्रायव्हरचे नांव, पार्टीचा सही शिक्का व मालाचे वर्णन इतकी माहिती गोडाऊनमध्ये ठेवलेली असते. सदरची माहिती गेट पासच्या पाठीमागे लिहिली जाते व तो गेट पास संध्याकाळी आमच्याकडे येत असतो. हे म्हणणे खरे आहे की, वर नमुद माहिती व्यतिरिक्त नेमका कोणत्या व्यक्तीने माल नेला आहे हे दाखविणेकरिता इतर कोणताही पुरावा आमच्याकडे नसतो. वादी फर्म तर्फे गोडाऊन मध्ये डिलीव्हरी करिता इसम असतो. सदर व्यवहाराच्या वेळी प्रणव रायनाडे व राक्षे अशा दोन व्यक्ती गोडाऊन मध्ये होत्या. हे म्हणणे खरे आहे की, सदर इसमांची प्रतिवादीशी ओळख नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादीला माल गेला आहे

किंवा नाही हे राक्षे व रायनाडे सांगु शकत नाहीत.

१६. प्रस्तुत व्यवहारामध्ये येणे बाकी असलेली सर्व बिले व गेट पास या कामी मी हजर केली आहेत. मी कोर्टात हजर केलेली बिले त्या दिवशी माल दिला आहे त्याच दिवशी संध्याकाळी काढलेली आहेत. नि.क्र. ३७ चे बिला वरील सही माझी आहे. सदर बिलावर गेट पास नंबर नमुद नाही. नि.क्र. ३८ ते ४३ चे बिलां वर गेट पास नंबर नमुद नाही. हे म्हणणे खरे आहे की, त्या सर्व बिलांवर माझ्या सह्या आहेत. सर्व बिलांवर ब्रोकरचे नांव आहे. नि.क्र. ३७ व ३८ वर चंद्रकांत आगम या ब्रोकरचे नावाची नोंद आहे व नि.क्र. ३९ ते ४३ वर राजु हावळ या ब्रोकरचे नांव नमुद आहे. हे म्हणणे खरे नाही की, चंद्रकात आगम हे आमचे व्यवहारातील ब्रोकर नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, नि.क्र. ४४ ते ४८ वर मी गेट पास दाखल केलेले आहेत. गेट पासच्या मागच्या खालील बाजुस माल नेणा-या पार्टीचा सही शिक्का असतो. नि.क्र. ४४ ते ४८ चे गेट पासवर प्रतिवादीचे नावचा शिक्का आहे व त्यावर आप्पासो गोपाळ घुणके यांची सही आहे. हे म्हणणे खरे आहे की, आप्पासो गोपाळ घुणके व चंद्रकांत गोपाळ घुणके यांचे देखील माझयाकडे खाती आहेत. हे म्हणणे खरे आहे की, त्या तिघांचा त्यावेळी एकत्र व्यवसाय होता. हे मला माहित नाही की, त्यांचा व्यवहार नंतर वेगवेगळा झाला किंवा कसे.

१७. प्रतिवादीचे नावचा शिक्का आहे व आप्पासो घुणके याची सही आहे, परंतु प्रतिवादीनेच माल नेला आहे याची पडताळणी करणेसाठी बिल असते. बिलावर प्रतिवादीची सही नसते. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादीनेच माल घेतला हे दर्शविणेकरिता माझे कडे प्रतिवादीचे सही व शिक्क्याचे कोणतेही बिल अगर अन्य कागदपत्रे नाहीत.

१८. निशाणी क्र. २८ वरील खाते उता-यामध्ये दिनांक १०/१२/२०१५ च्या दोन लेट पेमेंट इंटरेस्ट अशा नोंदी आहेत. हे म्हणणे खरे आहे की, ज्या दिवशी

पेमेंट आले त्याच दिवशी लेट पेमेंटच्या नोंदी आहेत. हे म्हणणे खरे आहे की, पेमेंट आधी जमा केलेले आहे व लेट पेमेंट इंटरेस्ट नंतर नमुद केले आहे. हे म्हणणे खरे आहे की, दिनांक १०/१२/२०१५ रोजी प्रतिवादीने बिलाची रक्कम भागविलेनंतर जेवढे शिल्लक राहिले आहे तितक्याच रक्केवर व्याजाची आकारणी केलेली आहे. सदर व्याजाची आकारणी किती टक्कयांनी केली आहे हे मला सांगता येणार नाही. बिलावर १८ टक्के लेट पेमेंट इंटरेस्टची नोंद आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्या प्रमाणे लेट पेमेंट इंटरेस्टची आकारणी केली जाते. हे म्हणणे खरे आहे की, नि.क्र.३७ ते ४३ चे बिलांवर व्याजाची आकारणी २४ टक्के नमुद आहे. दाव्यात व्याजाची आकारणी किती केली आहे हे मला आता आठवत नाही.

१९. हे म्हणणे खरे आहे की, शेवटी असणा-या येणे बाकीच्या रक्कमेच्या आधारे मी प्रस्तुतचा दावा दाखल केलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, पूर्वी प्रतिवादीकडून आलेल्या रक्कमेचा खाते उता-यामध्ये समावेश आहे. हे म्हणणे खरे आहे की, व्याजाची आकारणी देखील खाते उता-यामध्ये नमुद आहे. हे म्हणणे खरे नाही की, पूर्वी येणे असणा-या रक्कमेवर व्याजाची आकारणी केली असताना पुन्हा आणखी व्याजाची आकारणी केली आहे.

२०. संगणकीय बिलांसोबत पुरावा कायद्याप्रमाणे प्रमाणपत्र दाखल करावे लागते याची मला माहिती आहे. साक्षीदाराला दाव्याची कागदपत्रे दाखविली असता सदर कामी प्रमाणपत्र दाखल केल्याचे त्यास आढळुन आले नाही. नि.क्र.३४ लगत संगणकीयकृत प्रती करीता प्रमाणपत्र दाखल केले आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदरचे प्रमाणपत्र हे वादी फर्म करिता दाखल केले आहे. सदरचे प्रमाणपत्र विशाल विलास बुडकर यांच्या सहीचे आहे. सदरची व्यक्ती आमची अकाऊटंट आहे. सदर प्रमाणपत्रावर जॅकबिर्लो उद्योग एलएलपी या फर्मचे नांव नमुद आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदरचे प्रमाणपत्र हे या फर्म करिता आहे. हे म्हणणे खरे आहे की, नि.क्र. ३४ चे प्रमाणपत्रावर वादी फर्मचे नांव नाही.

२१. प्रणव रायनाडे व राक्षे यांची कोर्टात साक्ष घेणे मला आवश्यक वाटत नाही. राजु रामचंद्र हावळ यांची साक्ष घेणार आहे. चंद्रकांत आगम यांची साक्ष घेणेची मला आवश्यकता वाटत नाही.

२२. प्रतिवादी व त्यांचे परिवारांमध्ये आपसात वाटणी झाल्याचे मला माहित नाही. प्रतिवादी व त्यांचे भावांच्या मिळकती कोठे आहेत हे मला माहित नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी वादी फर्मला मदत होणेसाठी सदरची साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटे प्रतिज्ञापत्र दाखल करुन खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

वा.दा.का.दा. श्रवणोत्तर स्वीकृत्त,

Digitally signed by GANI MANIK NADAF
Date: 2025.09.03 17:28:38 +0530

दिनांक – ०३.०९.२०२५

(जी. एम. नदाफ)
दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,
इचलकरंजी.